**जिल्हा परिषदकोल्हापूर**
**ग्रामपंचायत विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**पहिला मजला, नागाळा पार्क, कोल्हापूर**
**Email** - dyceovptkop@gmail.com

# प्रेसनोट

## जिल्हयातील जेष्ठ कलावंतांनी मानधनासाठी ऑनलाईन अर्ज करा : पालकमंत्री कोल्हापूर

" राजर्षी शाहू महाराज जेष्ठसाहित्यीक व कलावंत मानधन सन्मान योजना " अंतर्गत महाराष्ट्र शासन ,निर्णय क्र.वृकमा 4321 (15) /प्रक्र. 145 / सां.का..4 पर्यटनव सांस्कृतिक विभाग, दि. 16 मार्च 2024 नुसारकला व साहित्य क्षेत्रातील योगदान असलेल्या मान्यवर जेष्ठ साहित्यीक व कलाकार यांना प्रती महीना 5000/- मानधन देणेत येते. पात्र कलाकारांनी या योजनेचा लाभ घेणसेसाठी महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार पोर्टलवर** **https ://aaplesarkar.mahaonline.gov.in/enya लिंक वर सांस्कृतिककार्य संचालनालय विभाग अंतर्गत दिनांक 1 जुलै 2025 ते 31 जुलै 2025 पर्यंत** ऑनलाईन अर्ज भरणे करिता मा. नाम. प्रकाश आबिटकर पालकमंत्री कोल्हापूर यांनी आवाहन केले आहे.

**या योजनेची लाभार्थी पात्रता अशी** 1. ज्यांचे वय 50 वर्षांपेक्षा जास्त आहे. दिव्यांगाना वयाची अट 10 वर्षांनी शिथिल करणेत येत आहे. (दिव्यांगाना वयोमर्यादा 40 वर्षे)2. ज्यांचेकला व साहित्यक्षेत्रातील योगदान कमीत कमी 15 वर्षे आहे. 3. ज्यांनी साहित्य व कलाक्षेत्रातसातत्यपुर्ण , दर्जेदार व मोलाची भर घातली आहे. 4. वयाने ज्येष्ठ असणारे, विधवा / परितक्त्या / दिव्यांग कलाकार यांना प्राधान्य राहील. 5.**ज्या** कलाकाराचे सर्व मार्गांनी उत्पन्न 60,000/- पेक्षा जास्त नसावे. 6.**ज्या कलाकारांची** उपजिविका फक्त कलेवरच अवलंबून होती मात्र सध्या त्यांना इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार. 7.**केंद्र** किंवा राज्य शासनाच्या महामंडळे इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार. 8. कलाकार / साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवाशी असणे बंधनकारक आहे.

**आवश्यक कागदपत्रे:** वयाचा दाखला, आधारकार्ड, उत्पन्न दाखला, रहिवाशी दाखला प्रतिज्ञापत्र, पती-पत्नी एकत्रीत फोटो, बँक पासबुक, अपंगत्व दाखला (लागु असल्यास) राज्य व केंद्र शासनाचे प्रमाणपत्र (लागु असल्यास), नामांकित संस्था व्यक्ती यांचे शिफारस पत्र (लागु असल्यास), विविध केलेचे पुरावे, आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.

---

प्रति,
मा. संपादक सो,
दै. ----------------

2/- सदरची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये देवून त्यास प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

सदस्य सचिव तथा
उपमुख्यकार्यकारी अधिकारी (गा.पं)
जिल्हा परिषदकोल्हापूर